सकाळ

# महाराष्ट्र-कर्नाटकने संवादाचा पूल मजबूत करावा

## डॉ. ज्ञानेश्वर मुळे; श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीचे उद्‍घाटन

**सांगली, ता. २४ :** महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नामुळे भारतीयत्व खंडित होता कामा नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. दोन्ही राज्यांचे आर्थिक, सांस्कृतिक; तसेच भाषिक संबंध जुने आहेत. देशातील न्याय मंडळ, कायदे मंडळ हा प्रश्न सोडवतील. मात्र, लोकांच्या भावनांचा मान राखून त्या उत्तेजित होऊ नयेत, याची दक्षता घेणे गरजेचे आहे. दोन्ही राज्यांनी संवादाचा पूल मजबूत करायला हवा, असे प्रतिपादन राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी केले.



**सांगली : श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि., आजरा (मल्टिस्टेट) शाखेचे उद्‍घाटन करताना डॉ. ज्ञानेश्वर मुळे. शेजारी डॉ. साधना शंकर, एम. एल. चौगुले, बाबासाहेब आजरी, सुहास नाडगौडा, डॉ. भास्कर ताम्हनकर, वासुदेव मायदेव, दत्तात्रय मायदेव.**

श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि., आजरा (मल्टिस्टेट) सांगली शाखेचे उद्‍घाटन डॉ. मुळे व त्यांच्या पत्नी डॉ. साधना शंकर यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले, की सीमाप्रश्नी तेथील नागरिकांच्या आतला आवाज महत्त्वाचा आहे. आर्थिक; तसेच कौटुंबिक पातळीवर दोन्ही राज्यांचे संबंध पूर्वापार आहेत. उद्योगाला पोषक वातावरण निर्माण करून समन्वय साधल्यास दोघांचीही प्रगती शक्य आहे.

निवृत्त प्रादेशिक परिवहन अधिकारी बाबासाहेब आजरी, निवृत्त अप्पर पोलिस अधीक्षक सुहास नाडगौडा यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ. भास्कर ताम्हणकर यांनी स्वागत केले. एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविकात संस्थेची माहिती दिली. प्रा. वासुदेव मायदेव, दत्तात्रय मायदेव, मीना रिंगणे, प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, दत्ता पाटील, दत्तात्रय बरगे, बाळासाहेब हिरेमठ, डॉ. आनंद मेणसे, डॉ. के. एस. पाटील, डॉ. प्रकाश हेरेकर, प्रा. राजाराम पाटील, पुष्पा नेसरीकर, प्रा. विनायक आजगेकर, रमेश चराटे, सतीश हेरवाडे, डॉ. मेघा आलासे, शाखाधिकारी श्रेयस गाडवे उपस्थित होते. आशिष सकळे, सचिन वाघमोडे, शाम बनकर, श्रीकांत बनकर, श्री. मुळीक यांचा सत्कार करण्यात आला. किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी यांनी आभार मानले. प्रा. डॉ. समिधा चौगुले यांनी गायलेल्या पसायदानाने समारंभाची सांगता झाली.

### 'दिल्लीतील लोकांची गल्लीतील संस्थेत गुंतवणूक'

डॉ. मुळे म्हणाले, की आजूबाजूचे नकारात्मक वातावरण पाहता रवळनाथ संस्थेने परंपरा व आधुनिकतेचा उत्तम संगम साधला आहे. दिल्लीतील माणूस गल्लीतील संस्थेत विश्वासाने गुंतवणूक करतो, हेच या संस्थेचे खरे यश आहे. मी स्वतः या संस्थेला अनेक वर्षांपासून ओळखतो. राष्ट्रीय नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर संस्थेचा लौकिक होईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.